**<u>फौ.कि.अ. क्र. ५/२०२२</u>**
सारिका व इतर वि. आनंदा व इतर
**नि.क्र.४० लगत**

**<u>जाबदारतर्फे साक्षीदार क्र.२ चा शपथेवर जबाबः</u>–**

**नाव :– दादा जयराम शेळके.**

६. <u>माझ्या सरतपासातील सर्व मजकूर मला माझ्या वकीलांनी वाचून, समजून सांगितलेला असून तो  माझ्या माहितीप्रमाणे खरा व बरोबर आहे.</u>

श्रवणोत्तर स्वीकृत.

Sd/-
**(एस.ए.विराणी)**
दि. १९.०७.२०२५.                न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, दौंड, जि. पुणे.

**<u>उलटतपास अर्जदारांतर्फे विद्वान विधीज्ञ श्री. बी. व्ही. देशमुख यांच्यामार्फत शपथेवर सुरुः</u>–**

७. माझे शिक्षण इयत्ता तिसरी नापास इतके आहे. अर्जदाराचे लग्न निंबोळी येथे ठरले होते. त्यावेळी मी तिथे हजर होतो. हे म्हणणे खरे नाही की, जाबदार क्र. २ यांच्या बहिणीचा मी मुलगा आहे. साक्षीदार म्हणतो, जाबदेणार हे माझे भाऊकीतले आहेत. हे म्हणणे खरे आहे की, अर्जदार व जाबदार क्र. १ यांचे लग्न निंबोळी गावात अर्जदार हिच्या मामाच्या घरात झाले. हे म्हणणे खरे नाही की, सदर लग्नाचा संपूर्ण खर्च अर्जदारचे वडील आणि मामांनी केला होता. साक्षीदार म्हणतो, अर्जदार व जाबदार यांनी मिळून केला होता. अर्जदार व जाबदार यांच्या रुखवताला काय काय दिले होते हे आता मला आठवत नाही. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदार व जाबदार यांच्या लग्नाची बोलणी वाटलूज येथे झाली होती व त्यावेळी मी हजर नव्हतो.

८. जाबदार क्र. १ याचे शिक्षण किती झाले हे मी नक्की सांगू शकत नाही. साक्षीदार म्हणतो, १० वी पर्यंत झाले असेल. जाबदार याने लग्नाचे वेळी अर्जदारच्या घरच्यांना त्याचे शिक्षण १५ वी पर्यंत झालेले असल्यामुळे आणि मुंबईत राहणार असल्यामुळे त्याला कुलर, गॅस शेगडी, दिवाण अशा चांगल्या वस्तूंची मागणी केली याबाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, जाबदार क्र. १ हा मुंबईला लग्नाच्या आधीपासून राहत होता. हे म्हणणे खरे आहे की, सारीकाचे मामा हे माझे चुलत चुलते

आहेत. हे म्हणणे खरे आहे की, मी वस्तीवरील घरात राहतो म्हणून मी गावात राहत नाही. जाबदार व त्याचे घरचे गावात राहतात. हे म्हणणे खरे आहे की, माझे जाबदार यांचेकडे नेहमी जाणे येणे होत नाही. हे म्हणणे खरे आहे की, जाबदार क्र. १ हा मुंबईला काम करत होता. साक्षीदार म्हणतो, काय काम करत होता हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की, जाबदारांची गावाकडे शेती आहे.

९.        हे म्हणणे खरे नाही की, मी सर्व जाबदारांसोबत अर्जदारला वाटलूज येथे परत घेऊन जायला कधीही गेलो नव्हतो. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही सर्वजण गेलो त्यावेळी अर्जदारकडे दुसरी मुलगी झाली म्हणून सोडचिठ्ठी दे अशी मागणी केली होती. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील सर्व मजकूर जाबदार याच्या सांगण्यावरुन खोटा नमूद केला आहे. अर्जदार व जाबदार यांचे कोर्टाबाहेर तडजोडीच्या प्रयत्नाच्या वेळी मी हजर नव्हतो. हे म्हणणे खरे नाही की, खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत.                                   समक्ष

Sd/-

**[ श्रीमती एस. ए. विराणी ]**

दिनांकः- १९.०७.२०२५                    न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, दौंड, जि. पुणे.